# महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे

## वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न.




महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे **संस्थेची ७२ वी** वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२५/०३/२०१७ रोजी सकाळी ९.३० वाजता संस्थेच्या कै. म. वा. जोगळेकर सभागृहामध्ये संपन्न झाली. सदर सभेस संस्थेचे बहूसंख्य सभासद उपस्थीत होते. संस्थेचे अध्यक्ष मा. आ. पृथ्वीराज देशमुख यांच्या अध्यक्षेखाली पार पडलेल्या या सभेत संस्थेच्या विकासात्मक दृष्टिने अनेक चांगल्या निर्णयावर चर्चा करणेत आली. त्यावर सभासदांनी पाठिंबा दिला व **सर्व ठराव सर्वानूमते मंजूर करण्यात आले**.

या प्रसंगी संस्थेचे सचिव प्रा. श्रीराम कानिटकर यांनी संस्थेच्या सचिव पदाचा कार्यभार स्विकारलेपासून सुरु केलेल्या नवीन उपक्रमांची सर्व सभासदांना माहिती दिली. तसेच सहसचिव श्री. सुरेंद्र चौगुले यांनी संस्थेच्या भविष्यातील वाटचाली बाबत माहिती दिली व संस्थेच्या विकासामध्ये मोलाचे योगदान दिल्याबद्दल संस्थेच्या पुणे व सांगली कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांचे आभार व्यक्त केले.